**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ
अकोला

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 06-03-2023**

**बुलढाणा(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2023-03-06 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2023-03-07 | 2023-03-08 | 2023-03-09 | 2023-03-10 | 2023-03-11 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 6.8 | 7.6 | 7.1 | 3.6 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 33.6 | 33.3 | 33.2 | 33.4 | 33.9 |
| किमान तापमान (अं.से) | 18.4 | 18.3 | 18.2 | 18.5 | 18.7 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 67 | 69 | 68 | 64 | 60 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 37 | 39 | 38 | 34 | 30 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 6.0 | 9.0 | 6.0 | 6.0 | 5.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 235 | 124 | 238 | 269 | 90 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 6 | 6 | 6 | 5 | 4 |

## हवामान सारांश / चेतावणी:

भारतीय हवामान खात्याने आज वर्तविलेल्या पाच दिवसीय हवामान अंदाजानुसार, बुलढाणा जिल्ह्यात दि. ०६ ते ०९ मार्च दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. दि. ०७ मार्च रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा गडगडाट होण्याची, वादळी वाऱ्याची (३०-४० किमी प्रती तास), गारपीट होण्याची शक्यता आहे. त्यानंतर दि. १० मार्च रोजी कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे.

## कृषि सल्ला:

हलक्या अवकाळी पावसाची शक्यता लक्षात घेता, शेतकऱ्यांनी गहु व हरभरा पिकांची कापणी केलेली असल्यास शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. साठवणुकीची व्यवस्था नसल्यास संबंधित शेतमाल प्लास्टिक शीटने/ताडपत्रीने झाकून ठेवावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

मेघगर्जनेसह विजांचा गडगडाट होण्याची, वादळी वाऱ्याची व गारपीट होण्याची शक्यता असल्याने फळबागांची योग्य ती काळजी घ्यावी , जेणेकरून उत्पादनात व उत्पन्नात घट होणार नाही.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| हरभरा | परिपक्व झालेल्या हरभरा पिकाची त्वरित कापणी करावी व त्याची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. परिपक्वते नंतर कापणीस उशीर झाल्यास कोरडे हवामान व जास्त तापमानामुळे घाटे फुटण्याची किंवा गळण्याची शक्यता असते. |
| भुईमूग | सध्याचे हवामान उन्हाळी भुईमुंग पिकावर फुलकिड्यांचा प्रादुर्भाव होण्यास पोषक आहे.त्याच्या नियंत्रणासाठी ५० मिली ईमिडाक्लोप्रिड २०० लिटर पाण्यात मिसळून प्रती एकर याप्रमाणे फवारणी करावी. |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| सूर्यफूल | सूर्यफूल पिकावरील तुडतुडे, फुलकिडे व पांढरी माशीच्या नियंत्रणासाठी ईमिडाक्लोप्रीड १७.८ ई.सी. या कीटकनाशकाची @ २.० मिली मात्रा प्रती १० ली. पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| गहू | वेळेवर पेरणी केलेल्या गव्हाचे पिक परिपक्व झाले असल्यास त्याची कापणी करून मळणी करावी. मळणी करताना दाणे फुटणार नाहीत याची काळजी घ्यावी.मळणी केल्यानंतर तयार झालेल्या शेतमालाला उन्हात वाळवावे जेणेकरून साठवणुकी दरम्यान धान्याची प्रत चांगली राहण्यास मदत होईल. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| वांगे | वांगीतील फळे पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी स्पिनोसॅड या कीटकनाशकाची १.० मिली/ ली. पाणी याप्रमाणात फवारणी करावी. |
| मिरची | कमी होत असलेली आर्द्रता व वाढत असलेले तापमान या परिस्थितीमुळे मिरची पिकामध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही,त्याकरिता उपाय म्हणून शेतकऱ्यांनी अॅझाडीरेक्टीन १५०० पी.पी.एम. ची ६०० मिली/ एकर २०० ली. पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| संत्रा | मृग बहारातील संत्रा फळाचा आकार वाढविण्यासाठी पोटॅशीयम नायट्रेट १.५ किलो/१०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| कांदा | कांदा पिकामध्ये मर/पानांवरील चट्टे या बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी मॅन्कोझेब ७५ % डब्ल्यू.पी.२५ ग्रॅम + सॅन्डोव्हीट स्टीकर ५० मिली/१० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| टरबूज | कलिंगड या पिकांतील नागअळीच्या नियंत्रणासाठी प्रोफेनोफॉस २० मिली / १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | मेघगर्जनेसह विजांचा गडगडाट, वादळी वारे व गारपीट ई. ची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी आपापली जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधून ठेवावीत. |